Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. ror.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# *रिझर्व्ह बँक – कार्यपध्दती*

प्रा.डॉ.एस.एल.पाटील
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख , सांगोला महाविदयालय, सांगोला.
जि. सोलापूर.

**प्रस्तावना—**

**पूर्व इतिहास**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही भारताची मध्यवर्ती बँक आहे. सध्या जगातील जवळपास सर्व देशाना मध्यवर्ती बँक आहेत. इ.स. १६५६ मध्ये जगातील पहिली मध्यवर्ती बँक स्वीडन या देशात ‘‘रिक्स बँक ऑफ स्वीडन” या नावाने स्थापन झाली. यानंतर इंग्लंडमध्ये १६९४ मध्ये बँक ऑफ इंग्लंड ही मध्यवर्ती बँक स्थापन होवून, तिने मध्यवर्ती बँकेचे तंत्र कार्ये, तत्वप्रणाली व कार्यपध्दती विकसित केल्याने जगातील अनेक देशात मध्यवर्ती बँक स्थापन झाल्या. बँक ऑफ इंग्लंड सर्वांची मार्गदर्शक ठरली. विसाव्या शतकात पहिल्या महायुध्दानंतर ब्रुसेल्स येथे १९२० मध्ये आंतरराष्ट्रीय वित्तीय सभा झाली तेथे प्रत्येक देशाने मध्यवर्ती बँक स्थापन करावी असा जो निर्णय झाला त्याचा परिणाम म्हणून भारतात इंग्रज सरकारने इंपिरिअल बँक ऑफ इंडियाची ३ इलाखा बँक एकत्र करून निर्मिती केली आणि या बँकेस भारताची मध्यवर्ती बँक म्हणून काम करण्यास सांगितले.

**रिझर्व्ह बँकेची स्थापना**

इंपिरिअल बँकेची स्थापना करताना पुढे तिचे रिझर्व्ह बँकेत रूपांतर करावे असा हेतू होता. परंतु १९२६ साली स्थापन झालेल्या हिल्टन यंग करन्सी कमिशनने स्वतंत्र अशी रिझर्व्ह बँक स्थापन करावी अशी शिफारस केली त्यापूर्वीच्या १८९८ च्या फौलर आणि १९१३ च्या चेंबरलिन समितीने भारतीय चलनव्यवस्थेचा अभ्यास करताना स्वतंत्र मध्यवर्ती बँकेची गरज सुचवली होती. त्या दृष्टीने १९२७ ला एक मसुदा कायदेमंडळापुढे आला पण तो मान्य झाला नाही, पुढे १९३१ च्या सेंट्रल बॅंकिंग इन्क्वायरी समितीने स्वतंत्र मध्यवर्ती बँकेची गरज तीव्र आहे हे स्पष्ट केले. त्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेला पोषक वातावरण निर्माण झालेने सप्टेंबर १९३३ साली बँकेचा मसुदा संसदेपुढे मांडण्यात आला आणि तो मान्य झाला त्यानुसार ६ मार्च १९३४ साली रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा कायदा संमत झाला. १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्थापन झालेचे जाहीर होवून प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात झाली. इंपिरिअल बँक ऑफ इंडिया ही इंग्रजांची खाजगी बँक होती तिच्या कडून मध्यवर्ती बँकेचे कामकाज रिझर्व्ह बँकेला दिल्यानंतर, ती बँक भारतातील एक मोठी खाजगी बँक म्हणून कार्यरत होती. पुढे १९५५ साली तिचेच राष्ट्रीयीकरण करून स्टेट बँक ऑफ इंडिया निर्माण झाली.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कार्य १९३५ पासून सुरू होताना ती १००% सरकारच्या मालकीची नव्हती त्यावेळी रू. १०० चे ५ लाख शेअर्स प्रमाणे रू. ५ कोटींचे भांडवल ठरवण्यात आले होते. या शेअर्स पैकी २२००० शेअर्स सरकारने घेतले होते, उर्वरित सर्व शेअर्स खाजगी लोकांच्या कडे होते अर्थात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ साली कायदा करून रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण (१ जुलै १९४९) करण्यात आले. खाजगी शेअर होल्डर्स योग्य ती नुकसान भरपाई देण्यात आली.

**रिझर्व्ह बँकेचे व्यवस्थापन आणि कार्यपध्दती**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापन मध्यवर्ती नियामक मंडळा मार्फत चालते. या मंडळात एक गव्हर्नर, चार डेप्युटी गव्हर्नर आणि १५ संचालक असतात. या १५ संचालकामध्ये ४ प्रतिनिधी स्थानिक मंडळाचे असतात, १०

प्रतिनिधी केंद्रसरकार नियुक्त करते आणि एक सरकारी अधिकारी असतो. संचालक मंडळास केंद्र सरकारच्या आदेशाप्रमाणे वागावे लागते. सोयीच्या दृष्टीने मुंबई, नवी दिल्ली, मद्रास, कलकत्ता येथे चार स्थानिक विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. त्यामध्ये प्रत्येकी ५ सभासद असतात, ते बँकेला फक्त सल्ला देण्याचे काम करतात.

RBI चा कारभार सर्व शाखामार्फत चालतो, मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद, कानपूर, नागपूर, पाटणा, अहमदाबाद, भुवनेश्वर कलकत्ता, गोहाटी, जयपूर, मद्रास आणि नवी दिल्ली येथे शाखा कार्यालये आहेत. इंग्लंड मध्ये लंडन येथे ही एक कार्यालय आहे. शिवाय स्टेट बँक ऑफ इंडिया आणि तिच्या सहाय्यक बँक या कायदयाने RBI च्या एजंट मानल्या आहेत.या सर्वामार्फत दैनंदिन कामकाज चालते. RBI गव्हर्नरचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

RBI चे प्रथम गव्हर्नर म्हणून श्री.स्मिथ यांनी काम पाहिले, त्यानंतर श्री.जे. बी. टेलर गव्हर्नर होते. श्री सी. डी. देशमुख हे पहिले भारतीय RBI चे गव्हर्नर झाले. त्यानंतर अनेक महनीय व्यक्तींनी RBI चे गव्हर्नरपद भूषविले आहे. त्यामध्ये श्री.बेंगाल रामाराव, श्री. आंबेगावकर, श्री.अयंगार, श्री. भट्टाचार्य, श्री.एल के झा, श्री.अडारकर, श्री.एस. जगन्नाथन, श्री.सेनगुप्ता, श्री.के.आर.पुरी, श्री.एम.नरसिंहम, श्री.आय.जी.पटेल, श्री.मनमोहनसिंग, श्री.ए.घोष, श्री.मेहरोत्रा, श्री वेंकटरमन, श्री.सी. रंगराजन, श्री.विमल जालन, श्री.वाय व्ही रेड्डी, श्री.डी. सुब्बाराव, आणि सध्या रघुराम राजन कार्यरत आहेत.

प्रशासनाच्या दृष्टीने बँकेत दहा विभाग तयार केले आहेत.

१. प्रशासकीय कर्मचारी (आस्थापना) विभाग
२. हिशोब व खर्च विभाग
३. शेती पत पुरवठा विभाग
४. औदयोगिक पतपुरवठा विभाग
५. बॅंकिंग व्यवहार व विकास विभाग
६. पतनियोजन विभाग
७. आर्थिक व्यवहार विभाग
८. विनिमय नियंत्रण विभाग
९. बिगर बॅंकिंग कंपन्या विभाग
१०.सांख्यिकी विभाग

सर्व विभागांना प्रमुख अधिकारी नेमण्यात आले आहेत तर काहींना कार्यकारी संचालक दिलेले आहेत. ते डे. गव्हर्नर बरोबर आणि डे. गव्हर्नर मुख्य गव्हर्नर बरोबर सल्ला मसलत करून कामकाज पाहतात. RBI मध्ये तसे दोनच प्रमुख विभाग आहेत. एक चलन निर्मिती आणि दुसरा बॅंकिंग विभाग एकूण कार्यातून होणारा फायदा RBI केंद्रसरकारला देते.

**RBI ची कार्ये**

जगातील सर्व मध्यवर्ती बँकाप्रमाणे सर्वसाधारण कार्ये RBI मार्फत पूर्ण केली जातातच परंतु भारतासारख्या विकसनशील देशात इतर विकसित देशापेक्षा अनेक वेगळी कार्ये RBI ला करावी लागतात. RBI ला सर्व प्रकारची करावी लागणारी कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

**१. चलननिर्मिती**

भारतात एक रूपयाची नोट वगळता सर्व किंमतीच्या नोटा तयार करण्याची मक्तेदारी RBI कडे आहे. एक रूपयाची नोट आणि नाणी भारत सरकारच्या वित्तमंत्रालयाकडून तयार केली जातात. चलनाला एकसारखेपणा आणि विश्वासार्हतेच्या दृष्टीने RBI ला चलन निर्मितीची मक्तेदारी दिलेली आहे. रू. २, ५, १०, २०, ५०, १००, ५००, १०००, ५०००, १०००० च्या नोटा RBI तयार करत होती मध्यंतरी ५०० ते १०००० च्या नोटा बंद केल्या आणि अलीकडे परत ५०० आणि १००० च्या नोटा तयार करण्यात आल्या.

**२. सरकारची बँक**

RBI केंद्रसरकार व राज्यसरकार यांची बँक म्हणून कार्य पहाते. सरकारच्या वतीने पैसे स्वीकारणे आणि देणे, सरकारी पैशाचे स्थलांतर करणे, सरकारला अल्पमुदत कर्जे देणे, सार्वजनिक कर्जाची व्यवस्था पाहणे आणि सरकारला

Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. ror.isrj.org

आर्थिक सल्ला देण्याचे काम RBI करते. RBI सरकारी कामासाठी मोबदला घेत देत नाही. तसेच त्यांच्या ठेवीवर व्याजही देत नाही.

**३. बँकांची बँक आणि अखेरचा रक्षणकर्ता**

देशातील सर्व बँकांची शिखर बँक म्हणून RBI काम पाहते.देशातील बँकांना सर्व प्रकारची मदत म्हणजे परवानगी पासून ते त्यांच्यावर येणाऱ्या संकटप्रसंगी RBI मदत करते. देशाच्या बँक व्यवसायास आकार व दिशा देण्याचे काम RBI करते.

**४. पत नियंत्रण**

व्यापारी बँक पतनिर्मिती करतात ते त्यांचे प्रमुख काम आहे. त्यासाठीच त्या निर्माण झालेल्या असतात. व्यापारी बँका त्यांच्याकडे आलेल्या रोख ठेवींच्या आधारावर मोठया प्रमाणावर कर्जे (जवळपास ५ पट) देतात म्हणजे दुय्यम ठेवी निर्माण करतात. अर्थव्यवस्थेसाठी हे काम गरजेचे असते, परंतु नफा अधिक मिळविण्यासाठी व्यापारी बँका रोखता हरवतात आणि ठेवीदारांना बुडवून एकूण बँक व्यवसाय धोक्यात येण्याची शक्यता असते. RBI ला यासाठी व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण आणावे लागते किंवा त्यांचे नियंत्रण करावे लागते अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार पतनियंत्रण RBI करते. त्यासाठी विशिष्ठ साधनाचा वापर करते.

**५. परकीय चलनाचे नियंत्रण**

कोणत्याही देशाला आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने आवश्यक असणारा भाग म्हणजे परकीय चलन होयृ त्याचा साठा जितका अधिक असेल तितका त्या देशाला आर्थिक विकासास उपयोग होतो. RBI ला या बाबतीत दोन कार्ये करावी लागतात. ती म्हणजे परकीय चलनाचा वापर अत्यंत व्यवस्थित करण्यासाठी त्याच्या वापरावर नियंत्रण ठेवावे लागते आणि दोन देशातील चलनाचा दर म्हणजे विनिमय दर स्थिर ठेवावा लागतो.

**६. निरसनगृहाची सुविधा पुरविणे**

व्यापारी बँकामधील आपआपसातील जी येणी देणी असतात ती पूर्ण करण्यासाठी निरसन केंद्राची निर्मिती RBI करते यामुळे पैशाचे रोखीकरण वेगाने होवून आर्थिक व्यवहाराना गती येते व अर्थव्यवस्थेच्या प्रगतीस उपयोग होतो.

**७. माहिती संकलन आणि प्रसिध्दी**

RBI संपूर्ण अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारची माहिती तिच्या सांख्यिकी विभागाकडून गोळा करते, तिच्यावर संस्करण करून ती स्वत:च्या वेगवेगळया धोरणासाठी वापरते तसेच सरकार, व्यापारी, सर्व बँका, संशोधक आणि जनतेतील अभ्यासकासाठी प्रसिध्द करते.

**८. RBI आणि आर्थिक विकास**

देशाच्या द्रव्यव्यवस्थेचा प्रमुख या नात्याने देशाच्या आर्थिक विकासासाठी अर्थपुरवठा करण्याची जबाबदारी RBI पार पाडते. RBI या दृष्टीने कृषी पतपुरवठा, औद्योगिक पतपुरवठा आणि अग्रक्रम क्षेत्राना खास पध्दतीने पतपुरवठा करते. शिवाय व्यापार व सेवाक्षेत्रालाही मदत करते. यासाठी RBI ने स्वातंत्र्यानंतर अनेक अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांची निर्मिती केलेली आहे. प्रामुख्याने IFC, SFC, IDBI, ICICI, UTI, ARDC, EXIM BANK, NABARD इ. ची निर्मिती करून अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना देण्यासाठी व्यवस्था निर्माण केली आहे. एवढेच नव्हे तर हुंडी बाजार योजना तयार करून व्यापार वृध्दीचा प्रयत्न केला आहे.

**९. प्रशिक्षण**

देशात द्रव्यव्यवस्था विकसीत करण्यासाठी RBI च्या पुढाकाराने सरकारने अनेक संस्था, बँका निर्माण केल्या तेथील प्रशासनात काम करणारा वर्ग प्रशिक्षित पाहिजे म्हणून RBI ने अनेक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण केल्या आहेत. मुंबई, पुणे, मद्रास येथे अशी ट्रेनिंग कॉलेज कार्यरत आहेत.

**१०. पर्यवेक्षण**

देशातील एकूण बँक व्यवसाय व्यवस्थित कार्यरत राहून त्याचा आर्थिक विकासात सकारात्मक सहभाग राहणेच्या दृष्टीने RBI ला सर्व बँक व्यवसाय आणि अर्थव्यवहारावर लक्ष ठेवावे लागते किंवा सुपरव्हिजन करावे लागते. तसा अधिकार १९३४ चा कायदा आणि १९४९ च्या बँक नियंत्रण कायदयाने RBI ला अधिकार दिलेला आहे. व्यवहार सुधारणे, त्यांना गती आणणे साठी लेखापरिक्षण आणि इतर मार्गाने सतत हे काम RBI करते.

**REFERENCES:**

1. Reserve Bank of India. 2007 “Manual on Financial and Banking Statistics”
2. Reserve Bank of India Monthly Bulletins various issues.
3. Report of Currency and Finance various Issues.
4. Handbook of Market Practices, FIMMDA.
5. Reserve Bank of India (1958): Functions and Working
6. Money Supply: Analytics and Methodology of compilation-Y V Reddy Committee
7. International Monetary Fund (2008): Monetary and Financial Statistics – Compilation Guide
8. RBI (1999), Repurchase Agreements (Repos): Report of the Sub-group of the Technical advisory
9. Committee on Government Securities Market, April, 1999, Mumbai: Reserve Bank of India.
10. RBI (2003), Report of the Internal Group on Liquidity Adjustment Facility, December 2003.
11. RBI (2003), Report of the Working Group on Instruments of Sterilization, Mumbai.